**नियमित दिवाणी दावा क्र. १००४/२०१९ निशाणी क्र. ३५ लगत**

**<u>प्रतिवादी क्र. १ व २ यांचे विधीज्ञ श्री ए.बी. बोधक यांच्यातर्फे वादीतर्फे साक्षीदार क्र. २ चा उलटतपास शपथेवर सुरू</u>–**

२. वादी भास्कर रंगनाथ कासार यांनी न्यायालयात काय दावा केला आहे, हे मला माहित आहे. वादी यांनी दोन दावे दाखल केले होते, त्यापैकी आज मी कोणत्या दाव्यात साक्ष देण्यासाठी आलो आहे, हे मला सांगता येईल. आज मी विहीर बुजवली त्या दाव्यामध्ये साक्ष देण्यासाठी आलो आहे. सर्वे क्र. १४/३ च्या चतुःसिमा मला सांगता येणार नाहीत. माझे वडील व चुलते यांच्यामध्ये न्यायालयामार्फत झालेले वाटप मी पाहिलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्यामध्ये व माझा भाउ वादी भास्कर कासार आमच्यामध्ये जे वाटप झाले, त्या वाटपामध्ये वादातीत विहीर ही माझा भाउ भास्कर कासार याच्या वाट्याला गेली, हे दाखविण्यासाठी आज माझ्याकडे कोणताही कागद नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादातीत विहीरीची नोंद सर्वे क्र. १४/३ च्या सात बारा उता–यावर नाही. **(साक्षीदाराला निशाणी ११ येथील सर्वे क्र. १४/३ चा सात बारा उतारा दाखविण्यात आला.)** हे म्हणणे खरे आहे की, सदर सात बारा उता–यावर विहीरीची नोंद नाही. ज्या सात बारा उता–यावर विहीरीची नोंद आहे, तो दाखल करण्यास मी तयार आहे. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे क्र. १५/५ हा प्रतिवादींनी खरेदी केला, तो खरेदी करण्याचा अग्रहक्क हा वादी कुटूंबाचा होता, असे आमचे म्हणणे आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यासाठी वादीने न्यायालयात दावा दाखल केला होता. हे मला माहित नाही की, तो दावा वादीच्या विरूध्द गेला किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्यात वादीने साक्ष दिली, त्याने ती मला सांगितली. हे म्हणणे खरे आहे की, वादीने साक्ष दिली त्यामध्ये काही चुका झाल्या, त्या दुरूस्त करण्यासाठी मी आज न्यायालयात साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादींनी वादातीत विहीर बुजवताना मी स्वतः पाहिलेले नाही.

३. वादातीत विहीरीवरील विज कनेक्शनचे बिल दाखल करण्यास मी तयार

नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, विहीरीतील विज मोटार ही दुस–याची होती. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादींनी सर्वे क्र. १५/५ विकत घेतला, याबाबत मला वाईट वाटले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या भावाने आज साक्ष कशी द्यायची, हे मला सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, सर्वे क्र. १४/३ मध्ये वादातीत विहीर नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

दिनांक: ०३/१२/२०२५.

( के. के. पाटील)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी
(न्यायालय क्र.२), संगमनेर.